**वाचा :-** १.शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,क्रमांक उमाशा-२०२१/प्र.क्र.१८-एसएम-४ दि.१५ फेब्रुवारी २०२१

२.शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,क्रमांक अर्थसं-४९२०/(३२/२०)अर्थसंकल्प,दि.१७ मार्च २०२१

३.शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे अनुदान वितरण आदेश क्र.६/२२०२०५११ क्र.शिसं/माध्य/टी.६/ अनु/५११/२०२०-२१/११३७,दिनांक १९.०३.२०२१

४.शासन पत्र शालेय शिक्षण शिक्षण व क्रिडा विभाग मुंबई क्र: संकीर्ण.२०२०/प्र.क्र.१०८ एसएम ४,दि.२२.०३.२०२१

५.शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,क्रमांक:वेतन १२१८/प्र.क्र.२८/टीएनटी ३,दि.२२ मार्च २०२१

६. शिक्षण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे यांचा अंदाज ४८१.२-२१.१४५० दिनांक-२२ मार्च २०२१ चा आदेश.

७.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचे जा.क्र उमाशा मुल्यांकन २०२०-२१/माध्य-ब/एस-७/११८६ दिनांक-२२ मार्च २०२१ चा आदेश.

---

जा.क्र./उमा -४०१/२०२०-२०२१/ 2326/6

दिनांक :- 24/3/21

**आदेश -**

**संदर्भ क्र:- १** च्या शासन निर्णयातील प्रपत्र -अ मध्ये नमुद उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये/जादा तुकड्या/अतिरिक्त शाखामधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांना दि. ०१ नोव्हेंबर २०२० पासून २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे.

**संदर्भ क्र:- २** नुसार वरील संदर्भिय शासन निर्णयात अनुदान मंजूर केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये/जादा तुकड्या/अतिरिक्त शाखामधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांना प्रत्यक्ष वेतन अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

**संदर्भ क्र:- ३** नुसार संदर्भिय शासन निर्णयात अनुदान मंजूर केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये/जादा तुकड्या/अतिरिक्त शाखामधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांना दि.०१ नोव्हेंबर,२०२० पासून २० टक्के अनुदान अदा करण्यासाठी जिल्हानिहाय तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**संदर्भ क्र:- ४** शासन पत्र शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय,मुंबई क्रमांक.संकीर्ण-२०२०/प्र.क्र१०८/एसएम-४,दि २२ मार्च २०२१ अन्वये पात्र शाळांचे प्रस्ताव शासन स्तरावर तपासून यादी घोषित करण्यात आली असल्याने यामधील कोणतीही तपासणी न करता पात्र शाळांचे वेतन अनुदान अदा करण्याबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

**संदर्भ क्र:- ५** नुसार वरील संदर्भिय आदेश नमुद उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये/जादा तुकड्या/अतिरिक्त शाखामधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांना दि.०१ नोव्हेंबर,२०२० ते फेब्रुवारी,२०२१ चे वेतन ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील १ ते ५ संदर्भानुसार खालील नमुद केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये/जादा तुकड्या/अतिरिक्त शाखामधील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांना दि.०१ नोव्हेंबर,२०२० पासून २० टक्के अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र | शासन निर्णयातील क्रमांक | संस्थेचे व उमवि / कमविचे नाव | अनुदान मंजूर केलेले उमावि/कमवि/जादा तुकड्या/अतिरिक्त शाखा | २० टक्के अनुदान मंजूर करावयाची पदे | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शिक्षक | | शिक्षकेत्तर | एकुण | |
| | | | | पूर्ण वेळ | अर्ध वेळ | | | |
| ०१ | ०७ | एम.सी.ई.सोसायटी पुणे चे अंग्लो उर्दू हायस्कूल अन्ड ज्युनिअर कॉलेज आझम कॅम्पस | कला प्रथम,विज्ञान प्रथि,वाणिज्य प्रथम | १२ | ०३ | ०२ | १७ | |

१.सदरील अनुदान शासन निर्णय दि.१५ फेब्रुवारी २०२१,दि.१७ मार्च २०२१ व संचालनालयाचे अनुदान वितरण आदेश दि.१९ मार्च २०२१ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

२.सदर अनुदानाचे वितरण दि.३१ मार्च २०२१ पूर्वी करणे बंधनकारक आहे.संबंधित शाळेचे प्राचार्य व अधिक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांनी तातडीने कार्यवाही पूर्ण करावी अन्यथा जबाबदारी निश्चित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३.सदरचे अनुदान ज्या उद्देशासाठी मंजूर करण्यात आलेले आहे त्याव्यतिरिक्त इतर उद्देशासाठी खर्च करण्यात येणार नाही.

४.सदरचे अनुदान २२०२,सर्वसाधारण शिक्षण,०२ माध्यमिक शिक्षण,११० अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्यक (००)(०७) अशआसकीय कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्यक अनुदान (अनिवार्य)(२२०२ ०५११),३६ सहाय्यक अनुदाने (वेतन) मागणी क्र.ई.२ या लेखाशिर्षाअंतर्गत खर्च करण्यात यावे.

५.संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयानुसार घोषित करण्यात आलेल्या वर्ग/शाखा/तुकडीवर सन २०१८-१९ च्या संचमान्यतेत मंजूर शिक्षक व शिक्षकेत्तर पदांनाच वेतन अनुदानाचे वितरण होईल,याची दक्षता घ्यावी.

६.सन २०१८-१९ च्या संचमान्यतेतील कार्यरत व वैयक्तिक मान्यता असलेल्या तसेच घोषित करण्यात आलेल्या उमावि/कमवि/तुकड्या/शाखावरील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांना अनुदान वितरीत करावे.

७.ज्या उमावि/कमवि यांना एकपेक्षा अधिक शाखा विनाअनुदा तत्वावर मंजूर आहेत,त्या पैकी एकच शाखा अनुदानावर आली असल्यास शासन निर्णयात मंजूर पदाच्या मर्यादेत कार्यभारानुसार मंजूर अर्धवेळ/पूर्णवेळ पदांना वेतन अदा करण्यात यावे.उदा.कला,वाणिज्यव विज्ञान शाखा मंजूर असलेल्या उमावि/कमविची कला शाखा व तीन पदे मंजूर झाली असल्यास भाषा विषयांच्या दोन अर्धवेळ (मराठी/हिंदी एक अर्धवेळ व इंग्रजी एक अर्धवेळ) पदांचे मिळून एक पद होईल व उर्वरित चार विषयांसाठी मंजूर दोन पूर्णवेळ पदांना अनुदान अनुज्ञेय होईल.

८.संबंधीत मुख्यध्यापक/प्राचार्य यांनी अधिक्षक,वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक),यांचे सुचनेनुसार वेतनाचे सयुक्त खाते सुरु करावे व संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे वैयक्तित बँक खात्यावर सदर वेतन अनुदानाची तरतूद जमा होण्याच्या दृष्टीने वेतन देयके सादर करावीत.

**(औदुंबर उकिरडे )**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे-१**

**प्रत** :-१.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद पुणे,सोलापूर,अहमदनगर यांना तात्काळ कार्यवाहीस्तव.
२.अधिक्षक,वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक),जिल्हा परिषद पुणे,सोलापूर,अहमदनगरयांना तात्काळ कार्यवाहीस्तव.
३.संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य-ॲंग्लो उर्दू बॉईज हायस्कूल पुणे------यांनी सदरच्या आदेशानुसार संदर्भ क्रमांक १ ते ७ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करावी.